विशेष लेख क्र. ८१ १७ ज्येष्ठ १९२९ शके (सायं ५.३०)

गुरुवार, दि. ७ जून २००७

# ऊर्जा संवर्धन प्रोत्साहनासाठी महाऊर्जातर्फे पारितोषिक योजना

**वीज हा अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे. विजेची टंचाई, निर्मिती व वापर या विषयी वेगवेगळ्या पातळीवर चर्चा होत आहे. वाया जाणारी वीज ही जवळपास विजेचा वापर करणाऱ्या सर्वांची समस्या आहे. त्यासाठी सर्वच क्षेत्रात इंधनाची बचत करण्यासाठी संशोधन, नागरिकांमध्ये जनजागृती करणे गरजेचं आहे. त्यासाठी राज्यामध्ये ऊर्जा संवर्धन कार्यक्रम राबवून कार्य करणाऱ्या घटकांना तसेच ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापन क्षेत्रातील कामामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाऊर्जातर्फे पारितोषिक दिली जातात. त्या विषयीची माहिती देणारा हा लेख....**

महाऊर्जाने ‘ऊर्जा बचत’ कार्यक्रमाअंतर्गत ४२५ कारखान्यांमधून ऊर्जा परिक्षणाचे काम पूर्ण केले केल्याने सुमारे ३० कोटी रुपयांची विजेची बचत झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील उद्योग कारखान्यात सुमारे २५ टक्के, घरगुती क्षेत्रात २० टक्के, वाणिज्यिक क्षेत्रात ३० टक्के व कृषीक्षेत्रात ३० टक्के ऊर्जा बचत करण्यास वाव आहे. यादृष्टीने **महाऊर्जा** प्रयत्नशील आहे. राज्यात भेडसावणारा सुमारे ४ हजार मे. वॅ. ऊर्जेचा तुटवडा कमी होण्याच्या दृष्टीने त्यामुळे मोलाची मदत होणार आहे.

सध्या राज्यस्तरावर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा प्रचार व प्रसार आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत महाऊर्जा महत्त्वाची कामगिरी करीत आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा संवर्धन कार्यक्रमाद्वारे सर्व क्षेत्रांमध्ये पारंपारिक इंधनाची बचत करण्याच्यादृष्टीने निरनिराळे कार्यक्रम राबवून जनजागृतीचे कार्य करत आहेत. केंद्र सरकारने संमत केलेला **‘ऊर्जा संवर्धन कायदा- २००१’** मार्च - २००२ पासून अस्तित्वात आला. कायद्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्य शासनाने पदनिर्देशित संस्था म्हणून महाऊर्जास मान्यता दिली आहे.

ऊर्जा संवर्धन व ऊर्जा व्यवस्थापन यामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील घटकांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने महाऊर्जातर्फे पारितोषिके वितरित करण्यात येणार आहेत. प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या घटकास मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येईल. पारितोषिकांसाठी राज्यातील **उद्योग** (ज्यांचे वार्षिक ऊर्जा देयक ५० लाख रुपयांपेक्षा जास्त आहे) **वाणिज्यिक संकुल**

..२/-

(ज्याचे वार्षिक ऊर्जा देयक ५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.), महानगरपालिका, 'अ' वर्ग नगरपालिका, वैयक्तिक, स्वयंसेवा संस्था, ऊर्जा परीक्षक, ऊर्जा सेवा पुरवणारे उद्योग, ऊर्जा परीक्षक, वैयक्तिक स्वयंसेवी संस्था आणि ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील संस्था, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सरकारी क्षेत्र वास्तुविशारद व बांधकाम व्यवसायी, एनर्जी सर्विस कंपन्या इत्यादींना या योजनेत सहभागी होता येईल.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी आवश्यक विहीत नमुन्यातील प्रश्नावली महाऊर्जा कार्यालयाकडे सादर करण्याची अंतिम तारीख **२२ जून, २००७** असून महाऊर्जाच्या वेबसाईटवर (www.mahaurja.com) योजनेची सविस्तर माहिती व प्रश्नावली नमूद केली आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२०-२६६१४३९३/४०३ यावर संपर्क साधता येईल. विजेची टंचाई व त्यावरील उपाय हा प्रश्न दिवसेंदिवस अवघड होत आहे. यातून बाहेर पडायचे असेल तर महाऊर्जा राबवत असलेल्या विविध योजनांमध्ये जनतेने सहभाग घेतला तर, वीज टंचाईचा प्रश्न काही प्रमाणात निश्चितच सुटू शकेल.

::- विभागीय माहिती कार्यालय, पुणे

००००